**गौरव • सीईओ वाघमारे यांच्या हस्ते डॉ. बेले यांचा सन्मान; गरजू रुग्णांना मिळाला दिलासा**

# वर्षभरात तेराशेवर कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया

**वाशीम, (जि. प्र.).** गावखेड्यात आणि दुर्गम भागात वास्तव्यास असलेल्या लोकांच्या आरोग्याची हमखास काळजी घेणारे केंद्र म्हणजे जिल्हा परिषदेमार्फत उभारण्यात आलेली प्राथमिक आरोग्य केंद्रे होत. जिथे खासगी आरोग्य सेवा उपलब्ध नाही आणि असेल; तरी आर्थिक कुवत नसल्याने परवडत नाही, अशा लोकांसाठी ही आरोग्य केंद्र जणू संजीवनीच आहे. अशा एकूण 27 आरोग्य केंद्रात जाऊन वाशीम जिल्ह्यातील एक सरकारी डॉक्टर तब्बल 1320 कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करतो, ही बाब वाशीम जिल्ह्यासाठी भूषणावह आहे.

रिसोड येथील तालुका आरोग्य अधिकारी डॉ. रामहरी बेले यांच्या या कार्याची दखल मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी घेतली आहे. डॉ. बेले यांचा त्यांनी प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन मंगळवारी सन्मान केला. यावेळी जि. प.चे अति. मुख्य कार्यकारी अधिकारी किरण गणेश कोवे, जिल्हा ग्रामीण आरोग्य यंत्रणेचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुहास कोरे आणि डॉ. विजय काळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

वाशीम जिल्हा आरोग्य यंत्रणा राष्ट्रीय कुटुंब कल्याण कार्यक्रम राबविण्यात अग्रेसर आहे. कुटुंब कल्याण शस्त्रक्रियेमध्ये जिल्ह्याचे (ग्रामीण) एकूण उद्दिष्ट 5698 आहे. त्यापैकी आतापर्यंत 3123 शस्त्रक्रिया पूर्ण करण्यात आल्या असून 55 टक्के उद्दिष्ट साध्य झाले आहे. यापैकी डॉ. बेले या एकाच व्यक्तींनी तब्बल 1320 शस्त्रक्रिया पूर्ण केल्या आहेत. जिल्ह्यामध्ये कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करणाऱ्या शल्यचिकित्सकांची कमतरता असल्यामुळे रिसोड येथील तालुका आरोग्य अधिकारी डॉ. रामहरी बेले यांनी जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये जाऊन शस्त्रक्रिया केल्या. सन 2023-2024 या एका वर्षात डॉ. बेले यांनी तब्बल 1320 कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया केल्या.



ग्रामीण भागातील आरोग्य सेवा आणखी सक्षम करण्यासाठी डॉ. रामहरी बेले यांच्यासारख्या रत्नाची आवश्यकता आहे. डॉ. बेले यांचे कार्य जिल्ह्यासाठी गौरवास्पद असून त्यांचा आदर्श इतर डॉक्टरसुद्धा घेतील, अशी मला आशा आहे.

**-वैभव वाघमारे,** मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. वाशीम.

## विविध उपक्रमांचे आयोजन

डॉ. बेले यांच्या अथक परिश्रमामुळे आणि सामाजिक बांधिलकी जपल्यामुळे ग्रामीण भागातील अनेक रुग्णांना आपल्या जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करून घेता आल्या. कुटुंब कल्याण शस्त्रक्रियाबाबत जनजागृती करण्याकरिता जिल्हा ग्रामीण आरोग्य यंत्रणेमार्फत जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुहास कोरे यांच्या मार्गदर्शनात ग्रामपातळीवर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये दर आठवड्याला कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया आणि बिनटाका (लेप्रोस्कोपी) शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते.

# वर्षभरात तेराशेहून अधिक कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया

**वाशीम, ता. २२ :** दूर्गम भागातील लोकांच्या आरोग्याची हमखास काळजी घेणारे केंद्र म्हणजे प्राथमिक आरोग्य केंद्र. जिथे खाजगी आरोग्य सेवा उपलब्ध नाही आणि असेल तरी आर्थिक कुवत नसल्याने परवडत नाही, अशांसाठी हे आरोग्य केंद्र जणू संजिवनीच आहे. अशा एकूण २७ आरोग्य केंद्रात जाऊन वाशीम जिल्ह्यातील एक सरकारी डॉक्टर तब्बल १३२० कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करतो ही बाब वाशीम जिल्ह्यासाठी भूषणावह आहे.

रिसोड येथील तालुका आरोग्य अधिकारी डॉ. रामहरी बेले यांच्या या कार्याची दखल मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी घेतली आहे. डॉ. बेले यांचा त्यांनी प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. यावेळी जि. प. चे अति. मुख्य कार्यकारी अधिकारी किरण गणेश कोवे, जिल्हा ग्रामीण आरोग्य यंत्रणेचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुहास कोरे आणि डॉ. विजय काळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

> “ग्रामीण भागातील आरोग्य सेवा आणखी सक्षम करण्यासाठी डॉ. रामहरी बेले यांच्यासारख्या रत्नाची आवश्यकता आहे. डॉ. बेले यांचे कार्य वाशीम जिल्ह्यासाठी गौरवास्पद असून त्यांचा आदर्श इतर डॉक्टर सुध्दा घेतील अशी मला आशा आहे.
>
> **- वैभव वाघमारे**, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद वाशीम

जिल्ह्यामध्ये कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करणाऱ्या शल्यचिकित्सकांची कमतरता असल्यामुळे रिसोड येथील तालुका आरोग्य अधिकारी डॉ. रामहरी बेले यांनी जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये जाऊन शस्त्रक्रिया केल्या. कुटुंब कल्याण शस्त्रक्रियेबाबत जनजागृती करण्याकरिता जिल्हा ग्रामीण आरोग्य यंत्रणेमार्फत जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुहास कोरे यांच्या मार्गदर्शनात ग्रामपातळीवर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.



**वाशीम :** डॉ. बेले यांचा सत्कार करताना मुख्य कार्यकारी अधिकारी वाघमारे.

लोकमत

# 'ते' जिल्हाभर फिरतात अन् शस्त्रक्रिया करतात!

## ११ महिन्यांत १३२० कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया

लोकमत न्यूज नेटवर्क

**वाशिम :** सरकारी आरोग्य केंद्रांत कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करणाऱ्या डॉक्टरांची कमतरता असल्याची उणीव भासू न देता, एक सरकारी डॉक्टर जिल्हाभर फिरून कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करीत आहेत. मागील ११ महिन्यांत १३२० कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करून डॉ. रामहरी बेले यांनी पश्चिम वऱ्हाडात आघाडी घेतली.

गाव-खेड्यात आणि दुर्गम भागात वास्तव्यास असलेल्या लोकांच्या आरोग्याची काळजी घेणारे केंद्र म्हणजे, जिल्हा परिषदेमार्फत उभारण्यात आलेली प्राथमिक आरोग्य केंद्र. अशा एकूण २७ आरोग्य केंद्रांत जाऊन वाशिम जिल्ह्यातील एक सरकारी डॉक्टर तब्बल १३२० कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करतो, ही बाब वाशिम जिल्ह्यासाठी भूषणावह आहे. रिसोड येथील तालुका आरोग्य अधिकारी डॉ. रामहरी बेले यांच्या या कार्याची दखल वाशिमचे मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी घेतली. डॉ. बेले यांचा त्यांनी प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषदचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी किरण गणेश कोवे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुहास कोरे आणि डॉ. विजय काळे यांची प्रमुख उपस्थिती होती. कुटुंब कल्याण शस्त्रक्रियेमध्ये वाशिम जिल्ह्याचे (ग्रामीण) एकूण उद्दिष्ट ५६९८ आहे. त्यापैकी आतापर्यंत ३१२३ शस्त्रक्रिया पूर्ण करण्यात आल्या असून, ५५ टक्के उद्दिष्ट साध्य झाले आहे. यापैकी डॉ. बेले या एकाच डॉक्टरने तब्बल १३२० शस्त्रक्रिया केल्यात. जिल्ह्यामध्ये कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करणाऱ्या शल्यचिकित्सकांची कमतरता असल्यामुळे रिसोड येथील तालुका आरोग्य अधिकारी डॉ. रामहरी बेले यांनी जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये जाऊन शस्त्रक्रिया केल्या.

> ग्रामीण भागातील आरोग्य सेवा आणखी सक्षम करण्यासाठी डॉ. रामहरी बेले यांच्यासारख्या रत्नाची आवश्यकता आहे. डॉ. बेले यांचे कार्य वाशिम जिल्ह्यासाठी गौरवास्पद असून, त्यांचा आदर्श इतर डॉक्टरसुद्धा घेतील, अशी मला आशा आहे.
>
> -वैभव वाघमारे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम

पुण्य नगरी

# वार्षिक कुटुंब कल्याण शस्त्रक्रियेचा उच्चांक

**डॉ. बेलेंकडून तब्बल तेराशे शस्त्रक्रिया; सीईओंनी केला सत्कार**

**वाशीम, दि. २२ (प्रतिनिधी)**

जिल्ह्यातील एकुण २७ आरोग्य केंद्रात जाऊन सरकारी डॉ. रामहरी बेले यांनी एका वर्षात कुटुंब कल्याणाच्या तब्बल १ हजार ३२०यशस्वी शस्त्रक्रिया केल्या. या कामाची दखल घेत मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारेयांनी डॉ.बेले यांचा २० फेब्रुवारी रोजी यथोचित सत्कार केला.



एका वर्षाच्या कालावधीत तब्बल १ हजार ३२० कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करतो ही बाब वाशिम जिल्ह्यासाठी भूषणावह आहे. रिसोड येथील तालुका आरोग्य अधिकारी डॉ. रामहरी बेले यांच्या या कार्याची दखल मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी घेत डॉ. बेले यांचा प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी जि. प. चे अति. मुख्य कार्यकारी अधिकारी किरण गणेश कोवे, जिल्हा ग्रामीण आरोग्य यंत्रणेचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुहास कोरे आणि डॉ. विजय काळे यांची प्रमुख उपस्थिती होती. जिल्हा आरोग्य यंत्रणा राष्ट्रीय कुटुंब कल्याण कार्यक्रम राबविण्यात अग्रेसर आहे. कुटुंब कल्याण शस्त्रक्रियेमध्ये जिल्ह्याचे (ग्रामीण) एकुण उद्दिष्ट ५ हजार ६९८ आहे. त्यापैकी आता पर्यंत ३ हजार १२३ शस्त्रक्रिया पूर्ण करण्यात आल्या असून ५५ टक्के उद्दिष्ट साध्य झाले आहे. यापैकी डॉ. बेले या एकाच व्यक्तींनी तब्बल १ हजार ३२० शस्त्रक्रिया पूर्ण केल्या आहेत.जिल्ह्यामध्ये कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करणाऱ्या शल्यचिकित्सकांची कमतरता असल्यामुळे रिसोड येथील तालुका आरोग्य अधिकारी डॉ. रामहरी बेले यांनी जील्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये जाऊन शस्त्रक्रिया केल्या. सन २०२३ -२४ या एका वर्षात डॉ. बेले यांनी तब्बल १ हजार ३२० कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया केल्या. डॉ. बेले यांच्या अथक परिश्रमामुळे आणि सामाजिक बांधिलकी जपल्यामुळे ग्रामीण भागातील अनेक रुग्णांना आपल्या जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करून घेता आल्या. कुटूंब कल्याण शस्त्रक्रियाबाबत जनजागृती करण्याकरिता जिल्हा ग्रामीण आरोग्य यंत्रणेमार्फत जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुहास कोरे यांच्या मार्गदर्शनात ग्रामपातळीवर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये दर आठवड्याला कुटूंब कल्याण शस्त्रक्रिया आणि बिनटाका (लेप्रोस्कोपी) शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते.

> **“ ग्रामिण भागातील आरोग्य सेवा आणखी सक्षम करण्यासाठी डॉ. रामहरी बेले यांच्यासारख्या रत्नाची आवश्यकता आहे. डॉ. बेले यांचे कार्य वाशिम जिल्ह्यासाठी गौरवास्पद असुन त्यांचा आदर्श इतर डॉक्टर सुध्दा घेतील अशी मला आशा आहे.**
>
> **-वैभव वाघमारे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद**

Smart Washim Edition
Feb 23, 2024 Page No. 1
Powered by : eReleGo.com

# एक वर्ष में 1300 से ज्यादा परिवार नियोजन शल्यक्रियाएं

## डीएचओ डॉ. रामहरि बेले ने बनाया कीर्तिमान



**प्रतिनिधि/प्रतिदिन अखबार**

**वाशिम, 21 फरवरी–** छोटे गांव व दुर्गम क्षेत्र में रहने वाले लोगों को स्वास्थ्य सेवा दिलाने के लिए जिप के प्राथमिक स्वास्थ्य केंद्र स्थापित किए गए हैं. जहां पर निजी स्वास्थ्य सेवा या तो उपलब्ध नहीं या आर्थिक हालत कमजोर रहने से वह बस के बाहर है. ऐसे लोगों के लिए ये प्राथमिक स्वास्थ्य केंद्र संजीवनी की तरह है. ऐसे कुल 27 केंद्रों में सेवा देकर जिले का एक सरकारी डॉक्टर सालभर में 1320 परिवार नियोजन की शल्यक्रियाएं करता है, यह बात वाशिम जिले के लिए गौरवास्पद है. रिसोड के तहसील स्वास्थ्य अधिकारी डॉ. रामहरि बेले के कार्य की दखल लेकर जिप के सीईओ वैभव वाघमारे का उनके हाथों प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देकर मंगलवार को सत्कार किया गया.

इस कार्यक्रम में जिप के अतिरिक्त सीईओ किरण कोवे, जिला स्वास्थ्य अधिकारी डॉ. सुहास कोरे, डॉ. विजय काले प्रमुख रूप से

## जिप के सीईओ वाघमारे के हाथों सत्कार

उपस्थित थे.

जिले में परिवार नियोजन शल्यक्रिया करने वाले डॉक्टरों की कमी रहने से रिसोड़ के तहसील स्वास्थ्य अधिकारी डॉ. रामहरि बेले ने जिले के सभी प्राथमिक स्वास्थ्य केंद्रों पर जाकर शल्यक्रियाएं की. वर्ष 2023-24 इस एक वर्ष में सामाजिक जिम्मेदारी निभाते हुए डॉ. बेले ने 1320 शल्यक्रियाएं करने का कीर्तिमान स्थापित किया.

परिवार कल्याण शल्यक्रिया के बारे में जनजागृति के लिए जिला ग्रामीण स्वास्थ्य यंत्रणा के मार्फत जिला स्वास्थ्य अधिकारी डॉ. सुहास कोरे के मार्गदर्शन में ग्राम स्तर पर विविध उपक्रम लिए गए. साथ ही प्राथमिक स्वास्थ्य केंद्र में हर सप्ताह में परिवार नियोजन शल्यक्रिया व बिना टांके (लेप्रोस्कोपी) शल्यक्रिया शिविरों का आयोजन किया गया था.

### डॉ. बेले जैसे रत्नों की जरुरत

ग्रामीण क्षेत्र में स्वास्थ्य सेवा और सक्षम बनाने के लिए डॉ. रामहरि बेले जैसे रत्नों की जरुरत है. डॉ. बेले का कार्य वाशिम जिले का गौरव बढ़ाने वाला है. इनका आदर्श अन्य डॉक्टर भी लेंगे, ऐसी मुझे उम्मीद है.

– वैभव वाघमारे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिला परिषद वाशिम